साप्ताहिक

# परळी परिसर

✻ परळी वैजनाथ ✻ शनिवार, दि. ०७ सप्टेंबर २०२४ ✻ पाने-४ ✻ २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

# ना.मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठान मार्फत यंदा १९ व्या श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे आयोजन

## अभिनेत्री रश्मीका मंदाना व अभिनेत्री क्रिती सनॉन यांच्या उपस्थितीत गणेश महोत्सवाचे आज उद्घाटन



परळी वैजनाथ, (बातमीदार):- राज्याचे कृषिमंत्री, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठानच्या मार्फत दरवर्षी साजरा केला जाणारा व महाराष्ट्रभर ख्याती असलेला श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सव यावर्षी १९ व्या वर्षात पदार्पण करत असून यावर्षी देखील श्री गणेश महोत्सवाचे परळी शहरात आजपासून दिमाखदार आयोजन करण्यात येत आहे.

आज श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी ना.धनंजय मुंडे यांच्या हस्ते शुभमुहूर्तावर श्रींची स्व.पंडित अण्णा मुंडे सभागृह, जत्रा मैदान, परळी येथे विधिवत स्थापना करून या गणेश महोत्सवास सुरुवात होईल.

या गणेश महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमास नॅशनल क्रश म्हणून ओळख असलेली पुष्पा फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना तसेच रामायण चित्रपटातुन देशाच्या घराघरात पोहोचलेली सीतेचा अभिनय अत्यंत उत्कृष्टरित्या केलेली अभिनेत्री



क्रिती सनोन या दोघींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर ता उदघाटन कार्यक्रमाचे निवेदन अभिनेता संकर्षण कऱ्हाडे करणार आहे.

यावर्षीच्या गणेश महोत्सवात प्रतिवर्षी पेक्षाही उत्तम दर्जाच्या कलाकारांच्या उपस्थितीत परळी वासियांना सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी मेजवानी गणेशोत्सवाचे १० ही दिवस अनुभवायला मिळणार आहे.

**असे आहेत कार्यक्रम :-**





पहिल्या दिवशी सात सप्टेंबर शनिवारी अभिनेता संकर्षण कराडे त्याचबरोबर सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, तेजा देवकर, ऋतुजा जुन्नरकर, पूनम कुडाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम तर दुसऱ्या दिवशी ८ तारखेला रविवारी सायंकाळी प्रसिद्ध गायक कैलाश खेर व गायिका अभिलिप्सा पांडा यांच्या शिव भजन गीतांचा कार्यक्रम होईल.

९ सप्टेंबर, सोमवार, अभिनेत्री अमृता खानविलकर, पूजा सावंत, समीरा गुजर, संस्कृती बालगुडे, प्रसंनजीत कोसंबी व अंशिका चोनकर यांचा महाराष्ट्राच्या तारका हा सुप्रसिद्ध संगीतमय कार्यक्रम.

१० सप्टेंबर, मंगळवार : सुप्रसिद्ध बॉलीवूड सिनेतारका, ड्रीमगर्ल, हेमामालिनी यांचा राधा कृष्ण लीला दर्शवणारी शास्त्रीय नृत्याद्वारे विशेष प्रस्तुती.

११ सप्टेंबर, बुधवार : महाराष्ट्राची संस्कृती अंतर्गत या अभिनेत्री मानसी नाईक, माधुरी पवार, मीरा जोशी, हेमलता बने, ऐश्वर्या बडदे यांचा संगीतमय कार्यक्रम.

१२ सप्टेंबर, गुरुवार : इंडियाज गॉट टॅलेंट फेम क्रेझी हॉपर्स ग्रुप आग्रा यांचा नृत्य थरार व हिंदवी पाटील व प्राजक्ता गायकवाड लावणी यांची जुगलबंदी.

१३ सप्टेंबर, शुक्रवार : चला हवा येऊ द्या सहभाग - स्मिता गोंदकर, जुई बेंडकले,



# शिवश्री मनोजदादा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी परळीत घोंगडी बैठकीचे आयोजन



परळी वैजनाथ, (बातमीदार):- मराठा संघर्ष योद्धा शिवश्री मनोजदादा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठा आरक्षण जनजागृती निमित्त रविवारी (दि.८) परळी वैजनाथ येथे घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

परळी शहरातील वैद्यनाथ मंदिर परिसरातील हालगे गार्डन सभागृहात सकाळी ११ वाजता ही बैठक सुरू होणार आहे. या बैठकीला परळी विधानसभा मतदार संघासह परिसरातील सकल मराठा समाजातील सर्व युवक, युवती, महिला, पुरूष आदी सर्वांनी लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान घोंगडी बैठकीला मराठा समाजातील नागरिकांनी उपस्थित रहावे म्हणून परळी मतदार संघातील गाव, वाडी, वस्तीवर जावून मराठा समाजाचे नेते, कार्यकर्ते जनजागृती करत आहेत. या बैठकीला आवर्जुन उपस्थित राहण्याचे आवाहन केले जात आहे.

परळी शहरात यानिमित्ताने विविध चौकात, मुख्य मार्गावर जागोजाग जनजागृती फलक, स्वागत कमानी, श्री जरांगे पाटील यांचे कटआउट लावले आहेत. या घोंगडी बैठकीला सकल मराठा समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्यामुळे बैठकीला येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होवून म्हणून बैठकीची जोरदार तयारी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर विविध संयोजन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. कार्यकर्त्यांना कामाचे वाटपही केले गेले आहे. बैठकीच्या निमित्ताने परळी मतदार संघातील सकल मराठा समाजाचे मोठे शक्तीप्रदर्शन होणार असल्याचे सांगितले जात आहे. श्री जरांगे पाटील यांचे परळीत जोरदार स्वागतही केले जाणार आहे. या बैठकीत श्री मनोजदादा जरांगे पाटील काय आवाहन करतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. **

# परळीत आज पासून संत श्री गुरूलिंग स्वामी पुण्यतिथी महोत्सवाला सुरुवात



परळी वैजनाथ, (प्रतिनिधी):- वीरशैव लिंगायत समाज परळीच्या वतीने शुक्रवार दि.७ सप्टेंबर पासून पंचम ज्योतिर्लिंग वैजनाथ मंदिरा जवळ असलेल्या बेलवाडी येथे संत श्री गुरुलिंग स्वामी पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री गुरुलिंग स्वामी मठ संस्थानचे अध्यक्ष श्री दत्ताप्पा इटके गुरुजी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

श्री गुरूलिंग स्वामी संस्थान (बेलवाडी) च्या विश्वस्त मंडळाची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत श्री गुरूलिंगस्वामी पुण्यतिथी महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून शुक्रवार दि.७ सप्टेंबरला उत्सवाला सुरूवात होणार आहे. प्रतिवर्षाप्रमाणे अखंड शिवनाम सप्ताह, पालखी सोहळा, भंडारा असे सर्व पारंपारिक कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला. श्री सदगुरू सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या उपस्थितीत सर्व कार्यक्रम होणार आहेत.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी श्री गुरूलिंग स्वामी पुण्यतिथी महोत्सव यावर्षी विविध सामाजिक, धार्मीक उपक्रम व पारंपारिक भंडारा कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. बेलवाडी येथे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष दत्ताप्पा ईटके गुरूजी यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वपूर्ण बैठक पार पडली. सप्ताहात अखंड शिवनाम, श्री गुरूलिंग स्वामींचा पालखी महोत्सव, कीर्तन, प्रवचन आदी धार्मीक कार्यक्रम श्री सदगुरू सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार असून यावर्षी उत्सव भव्य दिव्य प्रमाणात साजरा करण्यात येणार असून आज रात्रि ८ ते १० शि.भ.प श्री व्यंकट महाराज कार्लेकर यांचे कीर्तन होणार आहे तरी सर्व समाज बांधव व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री गुरुलिंग स्वामी मठ संस्थानचे अध्यक्ष दत्ताप्पा ईटके गुरूजी व सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे. ***

# नवगण महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ.मधुकर आघाव यांची निवड



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- येथील नवगण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये गेल्या २८ वर्षापासून प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे डॉ मधुकर आघाव यांची नुकतीच महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

परळी तालुक्यामध्ये राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये डॉ आघाव यांची यशस्वी वाटचाल राहिलेली आहे. वैद्यनाथ उद्योग समूहाचे चेअरमन म्हणून त्यांनी अनेक फॉर्म यशस्वी चालविल्या आहेत. जिल्हा परिषद सदस्य म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केलेले आहे. वाणिज्य विषयांमध्ये डॉक्टरेट पदवी मिळाल्यानंतर त्यांची वाणिज्य व इतर सांस्कृतिक क्षेत्रातील काही पुस्तके प्रकाशित आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये त्यांचे शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या प्रशासकीय कामांचा लाभ महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी व्हावा व संस्थेची जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडावी म्हणून क्षीरसागर कुटुंबीयांनी त्यांच्यावर विश्वास दर्शविलेला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल पालकमंत्री श्री धनंजय मुंडे साहेब यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे तसेच संस्थेचे सचिव डॉ भारतभुषणजी क्षीरसागर संस्थेच्या मार्गदर्शक डॉ दीपाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष युवा नेते डॉ योगेश भैय्या क्षीरसागर, डॉ सारिकाताई क्षीरसागर तसेच नवगण महाविद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे डॉ अनिल घुगे, श्री बाळासाहेब देशमुख, श्री उदगीरकर, संस्थेच्या प्रशासकीय समितीचे श्री देशमाने सर, श्री गुट्टे सर, उपप्राचार्य डॉ लालासाहेब घुमरे इत्यादींनीही त्यांच्या या निवडीबद्दल अभिनंदन केले आहे. डॉ आघाव यांच्या निवडीमुळे परळीच्या शैक्षणिक वातावरणात उत्साह दिसून येत असून महाविद्यालयाच्या कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले आहे. ***

# बीड जिल्ह्याला बाल विवाह निर्मुलनासाठी 'स्कॉच' चा पुरस्कार जाहीर

## तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या कार्याचा गौरव



बीड, (जिमाका) बीड जिल्हयाने बाल विवाह निर्मुलन कार्यक्रम उत्कृष्टपणे राबविल्याबद्दल स्कॉच या नामंकित संस्थेचा चा "स्कॉच २०२४ राष्ट्रीय पुरस्कार" बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांना जाहीर झाला आहे. विविध क्षेत्रातील अतुलनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार संस्था प्रदान करीत असते.

त्या बीडच्या जिल्हाधिकारी पदावर असताना त्यांच्या मार्गदर्शनात बीड जिल्हयात बाल विवाह रोखण्यासाठी विविध पाऊले उचलण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम झाला असून या काळात होणारे आणि होत असलेले बाल विवाह थांबविण्यात प्रशासनाला यश आले. याचीच पोच पावती म्हणुन स्कॉच या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेने या कामाची दखल घेत बीड जिल्हयाची बाल विवाह निर्मुलनासाठी निवड केली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा २१ सप्टेंबर २०२४ रोजी राजधानी नवी दिल्ली येथे ९९ व्या स्कॉच परिषदेनिमित्त आयोजित एका सोहळयात प्रदान केला जाणार आहे. हा पुरस्कार सध्या पुणे महानगर परिवहन मर्यादितच्या व्यवस्थापकीय संचालक तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे या हा पुरस्कार स्वीकारतील. **

# ड्रायव्हींग लायसनसचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरणासाठी १५ सप्टेंबर पर्यंत मुदत

मुंबई, (जि.मा.का.):- ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. ज्या वाहन चालकांनी मानवी स्वरूपात अनुज्ञप्ती प्राप्त केली आहे. अशा वाहन चालकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत अनुज्ञप्तीचे (ड्रायव्हींग लायसन्स) संगणक प्रणालीद्वारे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर यांनी केले आहे.

१५ सप्टेंबरनंतर मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरण केले जाणार नाही याची अनुज्ञप्ती धारकांनी नोंद घ्यावी. मुंबई (मध्य) ताडदेव येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) परिसरात कार्यालयीन इमारतीचे बांधकाम, आय ॲण्ड सी सेंटर, वाहन चालक प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम होणार आहे. या कार्यालयाकडून नोव्हेंबर २००६ पूर्वी जारी करण्यात आलेल्या सर्व अनुज्ञप्ती धारकांना अनुज्ञप्ती मानवी स्वरूपातच आहे, अशा अनुज्ञप्ती धारकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत या कार्यालयामध्ये येऊन आपले अनुज्ञप्तीचे संगणक प्रणालीमध्ये बॅकलॉग करून घ्यावे. आणि मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरण करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. ***

(पान १ वरुन).....**गणेश महोत्सवाचे उद्‌घाटन**

हेमांगी कवी, सागर करंडे, भारत गणेशपुरे, कुशल बद्रिके, गौरव मोरे, श्रेया बुगडे व इतर. १४ सप्टेंबर, शनिवार : महाराष्ट्राची हास्य जत्रा सहभाग - समीर चौगुले, पृथ्वीक प्रताप, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रसाद खांडेकर, शिवाली परब, चेतना भट व इतर. १५ सप्टेंबर, रविवार : अजय अतुल लाईव्ह, जगप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय व अतुल गोगावले यांचा ५० कलाकारांच्या संचासह लाईव्ह गीतांचा कार्यक्रम.

१६ सप्टेंबर, सोमवार - प्रसिद्ध गायक आनंद शिंदे व टीमचा भीमगीतांचा खास कार्यक्रम. दरम्यान या गणेश महोत्सवाच्या निमित्ताने धनंजय मुंडे साहेब यांच्या संकल्पनेतून परळी वासियांना तसेच बीड जिल्ह्यातील गणेश भक्तांना सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी मेजवानी अनुभवास मिळणार असून या गणेश महोत्सवात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे व कार्यक्रमांचा आनंद घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ नेते तथा नाथ प्रतिष्ठानचे कार्यवाह वाल्मीक अण्णा कराड यांनी केले आहे. ***

संपादकीय...

# 'सरस्वती'चा कोंडमारा...

**सुविचार :-** पोट कसेही भरता येते पण काळीज भरायला माणसाजवळ माणूसच असावा लागतो.

परळी शहराच्या मधोमधून वाहनारी गावगंगा म्हणून 'सरस्वती नदी' ओळखली जाते. या नदीला मोठे धार्मिक, पौराणिक महत्व आहे. 'परळी महात्म्य' या ग्रंथात काही धार्मिक कथाही या नदीशी संबंधित आहेत. अंबेवेशीत या नदीकाठावर जुने श्री शनी मंदिर, श्री विठ्ठल मंदिर, श्रीराम मंदिर आहे. शिवरात्रीवेळी श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची पालखी मिरवणूक अंबेवेशीत आल्यानंतर शोभेची दारू येथे नदीपात्रात उडवण्याची प्रथा आहे.

अशीही पुराणकाळापासून परळीतून वाहणारी सरस्वती नदी. तिचा उगम परळी शहराच्या दक्षिणेला श्री वेताळ मंदिर परिसरातील एका डोंगर कुशितून होतो. गोमुखातून निघणारी ही नदी परळीच्या गावभागातून वाहात पुढे संगम या गावाच्या परिसरात ब्रम्हनदीला मिळते. कधीकाळी परळीकरांची पिण्याच्या पाण्याची, सांडपाण्याची गरज ही नदी भागवत असे. पूर्वी ती बारमाही वाहत होती असे लोक म्हणतात. कालौघात पाऊस काळ कमी होत गेल्याने तिचे बारमाही वाहणे थांबले आहे.

परळीची गावगंगा असणाऱ्या या नदीचे आज सगळे रूपच पालटले आहे. परळीचे पहिले नगराध्यक्ष कै.लक्ष्मणराव देशमुख यांच्या कारकीर्दीत सुमारे ७० वर्षापुर्वी या नदीवर अंबेवेस भागात केवळ आठशे रूपये खर्च करून परळीतला पहिला पूल बांधला गेला. पुढे तत्कालीन नगराध्यक्ष गुरूलिंगअप्पा मेनकुदळे यांच्या काळात आजच्या मिलिंद शाळेजवळचा पूल बांधला. वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढत्या वस्त्यांमुळे सांडपाण्याची समस्या वाढू लागली. या नदी परिसरातील विविध गल्ली बोळातून वाहणारी गटारे व त्या गटारातील घाण पाणी या नदीला येऊन मिळू लागले. पुढे हे गटाराचे पाणी, घाण, कचरा या नदी पात्रात वाढतच गेला. नदीला गटार गंगेचे स्वरुप आले. पवित्र सरस्वती नदी 'लेंडी' या नावाने ओळखली जाऊ लागली. पैशाचा हव्यास, वाढते शहरीकरण, वाढती लोकसंख्या यामुळे या नदी पात्राच्या काठावर काही ठिकाणी नदी पात्रातही घरे बांधून लोक राहू लागले. अंबेवेस, मिलिंद शाळेजवळ तर या नदी पात्रातच मोठे व्यापारी संकुल बांधले गेले. अलिकडच्या काळात तर गाव भागात जमा होणारा सुका, ओला कचराही या नदीपात्रात रिचवला जाऊ लागला. या सर्व प्रकाराने नदीपात्र अरूंद होत जाऊन आज त्याला छोट्या ओढ्याचे, गटाराचे स्वरुप आले आहे. गेल्या आठवड्यात परळी परळी परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे या नदीपात्रात पाणी तुंबण्याचा, पुलावरून वाहण्याचा प्रकार घडला. यामुळे अंबेवेशीतून गावभागात जाणे अवघड होउन बसले होते. अंबेवेशीत श्री शनि मंदिराच्या पायथ्याशी तर दुसऱ्या बाजुला राम मंदिराच्या भिंतीपर्यंत पुराचे पाणी आले होते. बरकतनगर, गंगासागर नगर, तुळजाई नगर आदी भागातील काहीच्या घरात, दुकानात पाणी शिरले. मोठे नुकसानही झाले. लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, पालिकेचे पदाधिकारी आदींनी भेटी देवून नुकसानीची पाहणी केली, नागरिकांना धीर दिला.

सरस्वती नदीचा विविध कारणामुळे झालेला कोंडमारा, कोंडलेला श्वास झालेल्या नुकसानीस कारणीभूत आहे. सरस्वती नदीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आता परळीतील जाणकार, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणप्रेमी यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. सरस्वती नदी स्वच्छ मोहिम हाती घेण्याबरोबरच नदीपात्रात घाण, कचरा, गटाराचे पाणी सोडण्यावर कडक बंधने घालणे गरजेचे आहे. नदीपात्रात व काठावर दिवसेंदिवस वाढत चाललेली बांधकामे काढली पाहिजे, ती अतिक्रमणे थांबली गेली पाहिजेत. अंबेवेशीतील या नदीवरील पूल नव्याने बांधून उंची वाढवली गेली पाहिजे. अशा विविध उपाययोजना झाल्यातरच 'सरस्वती नदी' चा जीव गुदमरणार नाही, तिचा कोंडमारा होणार नाही, पुन्हा ती पूर्वीप्रमाणे आनंदाने वाहू लागेल. दरम्यान, परळी पालिकेचे प्रशासन, या प्रशासनाचे दूर्लक्ष, अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणा या नदीचा कोंडमारा करण्यास कारणीभूत आहे. याबाबत संबंधितांना जाब विचारणारे कुणी आहे की नाही असा प्रश्न परळीत सर्वसामान्यांना पडतो आहे. ***

# तुमचा.. आमचा सर्वांचा गणेशोत्सव..!



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान सर्वांना माहित आहे. जहाल गटांचे नेते अशी लोकमान्यांची ओळख होती. त्यांचा आणि थोर समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांचा स्वतंत्र्य की सुधारणा हा वाद देखील सर्वांना माहीत आहे .प्रथम स्वतंत्र्य व मगच सुधारणा असा आग्रह धरणाऱ्या लोकमान्यांनी स्वतंत्र्यासाठी जनजागर व्हावा म्हणून घराघरात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाला सार्वजनिक रुप दिले हा निर्णय खरोखरच क्रांतिकारी निर्णय ठरला आहे.

गणेशोत्सव म्हणजे ग्रामीण अर्थकारणास गती देणारा उत्सव या अर्थाने आपण याकडे बघितलं पाहिजे या महोत्सवाच्या निमित्ताने एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेला काही काळासाठी गती प्राप्त होते असे म्हणायला हरकत नाही.

गणेशाला हिंदू शास्त्रात अग्रपूजेचा मान आहे. आपल्याकडे कला म्हणून ६४ कलांचा परिचय सर्वांना आहे ... आणि गणेशाला सकल कलांचा नायक अर्थात गणनायक म्हणून ओळखले जाते. आपला देश आणि आपली संस्कृती यांचा विचार करताना आपल्या जीवनशैलीशी निगडित असे सण उत्सव आपल्याकडे आहेत आणि त्यांचं महत्व देखील अधिक आहे.

१२ बलुतेदार परंपरा आज फारशी दिसत नाही मात्र अद्यापही थोड्याफार प्रकारे ग्रामीण भागात व्यवसायांचे स्वरूप कायम आहे. गणेशोत्सवाच्या काळात मूर्ति घडविणारे मूर्तिकार, त्यांना रंगकाम करणारे रंगारी असे खास मनुष्यबळ यांना जसे काम आणि उत्पन्न मिळते तसेच या काळात इतरही बाबतीत व्यवसायिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार प्राप्त होतो. गणेशोत्सव हा तसा महाराष्ट्राचा उत्सव म्हणून ओळखला जात असला तरी लगतच्या राज्यांमध्ये अगदी राजधानी दिल्लीपर्यंत याचा विस्तार झालेला आपणास दिसतो आता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी माणूस आहे त्या सर्व ठिकाणी आता हा गणेशोत्सव साजरा होत असतो. गणेशोत्सव निमित्ताने मंडप, वाद्य, संगीत या क्षेत्रातही मोठी उलाढाल होते. विविध प्रकारचे देखावे तयार करण्याची स्पर्धा या काळात होते यातूनही मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होत असतो.

कोकणात गणेश उत्सवाचे खास महत्त्व आहे गणपती आणि गौरीच्या सणासाठी चाकरीसाठी मुंबई गाठलेल्या सर्व चाकरमान्यांनी कोकणात येऊन उत्सव साजरा करायचा यातून कोकणात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पैसा येतो प्रत्येक चाकरमानी आवर्जून यासाठी खर्च करतो. कोकणातील ग्रामीण व्यवस्थेला बळकटी या काळात मिळते. कोकणा बाहेर राज्यातील इतरत्र सर्व ठिकाणी महालक्ष्मीचा तीन दिवसाचा उत्सव याच १० दिवसात असतो. यात रांगोळ्यापासून.... रोषणाईपर्यंत प्रत्येक घरातून खर्च केला जातो मिठाई, पुरणपोळी अशी पदार्थ तसेच विविध प्रकारच्या भाज्यांचे नव्हे तर अगदी पाने आणि फुलं यांचंही या सणात महत्त्व आहे. शेतकऱ्यांना देखील याचा थेट आर्थिक लाभ प्राप्त होतो म्हणूनच याला ग्रामीण अर्थव्यवस्थेत अधिक मोल आहे. सण साजरा करताना संस्कृतीचा प्रसार देखील होतो. मेळे, आर्केस्ट्रा आदी काळाच्या मागे पडले असले तरी गणेशोत्सव मंडळी विविध प्रकारच्या स्पर्धा या काळात घेतात यामुळे सर्वांना आपल्या कलागुणांना जगासमोर मांडण्याची संधी मिळते.

विविध गणेश मंडळे सामाजिक उपक्रमांवर भर देतात यातून समाजात अनेक चांगली कामे याच काळात होताना दिसतील सोबतच अन्नदानाचे महत्त्व जाणून या काळात मोठ्या प्रमाणावर अन्नदान करणारे भंडारा सारखे उपक्रम या १० दिवसात अधिक होतात. आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरे देखील या गणेशोत्सवात अनेक गणेश मंडळे आयोजित करतात. समाजातील आबालवृद्धांचा प्रत्येकाचा असा हा लाडका सण म्हणजे कला, साहित्य, संस्कृतीची एक पर्वणी असते अनेक पैलूंसह सामाजिक जाणीव प्रगल्भ करणारा उत्सव म्हणून याकडे बघितले पाहिजे आता लगबग बाप्पाच्या आगमनाची..

**– प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशु प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतीलच असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

# सहा विधानसभा मतदार संघात २१ लाख ९७ हजार ८३० मतदार

बीड, (जिमाका): बीड जिल्हयातील सहा विधानसभा मतदार संघात एकूण २१ लाख ९७ हजार ८३० मतदार आहेत. भारत निवडणूक आयोगाने आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक विचारात घेऊन दि. ०१.०७.२०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाचा दुसरा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार पुनरीक्षण पूर्व उपक्रम राबविण्यात आल्यानंतर प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली व प्रारुप मतदार यादीवर दिनांक ०६/०८/२०२४ ते २०/०८/२०२४ या कालावधीमध्ये दावे व हरकती स्वीकारण्यात आले, व दावे व हरकती निकाली काढल्यानंतर दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ रोजी जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघ, तहसिल कार्यालये, सर्व मतदान केंद्राचे ठिकाणी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या ठिकाणी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अंतिम मतदार यादीनुसार बीड जिल्हामध्ये पुरुष मतदार ११.५८,९९८, स्त्री मतदार १०,३८,८०९ व तृतीयपंथी मतदार २३ असे एकूण २१,९७,८३० मतदार आहेत.

**विधानसभा निहाय मतदार :-** विधानसभा मतदार संघ निहाय मतदार संख्या पुढील प्रमाणे- २२८ गेवराई विधानसभा मतदार संघ मध्ये पुरुष मतदार ३,७४,२२१, स्त्री मतदार १,७६,९१० व तृतीयपंथी मतदार ०३ असे एकूण ५,५१,१३४ मतदार आहेत, २२९ माजलगाव विधानसभा मतदार संघ मध्ये पुरुष मतदार १,८३,५०५, स्त्री मतदार १,६३,६९२ व तृतीयपंथी मतदार ०१ असे एकुण ३,४७,१९८ मतदार आहेत,२३० बीड विधानसभा मतदार संघ मध्ये पुरुष मतदार २,००,०९९, स्त्री मतदार १,७८,०७१ व तृतीयपंथी मतदार १० असे एकुण ३७८१८० मतदार आहेत,२३१ आष्टी विधानसभा मतदार संघ मध्ये पुरुष मतदार २,०३,८३८ स्त्री मतदार १,७९,१९१ व तृतीयपंथी मतदार ०१ असे एकुण ३८३०३० मतदार आहेत, २३२ केज विधानसभा मतदार संघ मध्ये पुरुष मतदार २,००,२८५ स्त्री मतदार १,८१,८१७ व तृतीयपंथी मतदार ०५ असे एकुण ३८२१०७ मतदार आहेत, २३३ परळी विधानसभा मतदार संघ मध्ये पुरुष मतदार १,७३,९६३, स्त्री मतदार १,५९,१२८ व तृतीयपंथी मतदार ०३ असे एकुण ३,३३,०९४ मतदार आहेत.अंतिम मतदार यादीमध्ये २३० बीड विधानसभा मतदार संघामध्ये सर्वाधिक मतदार नोंदणी १,०९७१ एवढे तर सर्वाधिक कमी मतदार नोंदणी ही २३२ केज विधानसभा मतदार संघामध्ये ७,२२० एवढी नविन नोंदणी झाली आहे.

**नव मतदार :-** २२८ गेवराई मतदार संघामध्ये ९७४३ नवमतदार, २२९ माजलगाव विधानसभा मतदार संघामध्ये ७५३९ नवमतदार, २३१ आष्टी विधानसभा मतदारसंघामध्ये ९२६३ नवमतदार, २३३ परळी विधानसभा मतदार संघामध्ये ७४४१ नवमतदार यांची नोंदणी झाली आहे.या कालावधीमध्ये मतदार यादीतील नोंदी सोबत मतदार यांनी आपला मोबाईल नंबर लिंक करण्याचाबत उपक्रम राबविले आहेत व यापुढे देखील मोबाईल नंबर लिंक करणे चालू आहे करीता सर्व मतदारांनी आपल्या मतदार यादीतील नोंदीसोबत मोबाईल नंबर लिंक करावे असे जिल्ह्यातील नागरीकांना अवाहन करण्यात येत आहे. ***

## 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई (जि.मा.का.):- शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी ु.ारहरूेक्षरपरवीं.ॲस या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे/ प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www. mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. **

